# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०१७
## (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(बुधवार, दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र.१ ते ३)**

(१) **श्री. जयंत पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अस्लम शेख, अमर काळे, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. अतुल भातखळकर, अमित साटम, विलासराव जगताप, शशिकांत शिंदे, मो. आरिफ नसीम खान, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, हर्षवर्धन सपकाळ, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, कालीदास कोळंबकर, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. नितेश राणे, संग्राम थोपटे, प्रा. विरेंद्र जगताप, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री सुनिल शिंदे, अजय चौधरी, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, संदीप नाईक, भास्कर जाधव, हसन मुश्रीफ, राणाजगजीतसिंह पाटील, नरहरी झिरवाळ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, सुरेश लाड, किसन कथोरे, शरद सोनावणे, अशोक पाटील, डॉ. राहुल पाटील, श्री. सरदार तारासिंह, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. प्रकाश फातर्पेकर, ज्ञानराज चौगुले, बाळासाहेब थोरात, डी. पी. सावंत, प्रकाश सुर्वे, सुनिल राऊत, सुनिल प्रभू, डॉ. सतीश पाटील, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, श्री. संजय पोतनीस, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. दिपक चव्हाण, बच्चू कडू, डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री. राजेश टोपे, राहुल मोटे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. रुपेश म्हात्रे, मंगेश कुडाळकर, अबु आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

" भायखळा, मुंबई येथील आर्थर रोड कारगृहामधील वॉर्डन मंजुळा गोविंद शेट्ये यांना दोन अंडी व पाच पावांचा हिशेब लागत नसल्यामुळे कारागृह अधीक्षक आणि महिला पोलीस कर्मचा-यांनी मारहाण तसेच लैंगिक अत्याचार केल्यामुळे उपचारादरम्यान जे.जे.रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, मंजुळा शेट्ये यांच्या गळयाभोवती साडीचा फास लावून बॅरेक क्र.१ मधून बॅरेक क्र.५ पर्यंत विवस्त्र अवस्थेत सर्व कैद्यांसमोर लाठया काठयांनी केलेली मारहाण, मध्यस्थी

करण्यासाठी काही महिला कैदी गेले असता तुमचेही असेच हाल करण्यात येईल अशी धमकी कारागृह अधीक्षक आणि महिला पोलीस कर्मचा-यांनी देणे, या कारागृहातील इतर महिला कैद्यांसह काही महिला पोलीस अधिकारी व कर्मचा-यांवरही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून लैंगिक अत्याचार होत असल्याचेही निर्देशनास येणे, या संपूर्ण प्रकारामुळे महिला कैद्यांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, त्यामुळे मंजुळा शेटये यांच्या मृत्युची चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील**, **विजय वडेट्टीवार**, **अमित देशमुख**, **सुनिल केदार**, **अमर काळे**, **हर्षवर्धन सपकाळ**, **मो. आरिफ (नसीम) खान**, **अमीन पटेल**, **अस्लम शेख**, **अब्दुल सत्तार**, **ॲड. यशोमती ठाकूर**, **सर्वश्री. योगेश सागर**, **अबु आजमी, किसन कथोरे, संजय केळकर, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरे, ठाणे, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर या ठिकाणच्या रिक्षा चालकांची सुरु असलेली मनमानी, कापूरबावडी, ठाणे येथे रिक्षावाल्याकडून केल्या जाणाऱ्या विनयभंगापासून बचाव करण्यासाठी एका तरुणीने रिक्षातून मारलेली उडी, तसेच रिक्षात बसलेल्या दोन मुलींनी रिक्षाचालकाने अश्लील हावभाव केल्याने घाबरुन मारलेली उडी, जवळचे भाडे नाकारणे, प्रवाशासोबत उध्दट वर्तन करणे, मनमानी भाडे आकारणे, अशाप्रकारे वेगवेगळ्या मार्गांनी रिक्षाचालकांच्या सुरु असलेला मनमानीचा त्रास प्रवाशांना विशेषत: महिला प्रवाशांना होत असून त्यावर वाहतूक शाखा तसेच पोलीस यंत्रणेचे कोणतेही नियंत्रण नसणे, परिणामी सर्वसामान्य प्रवाशांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. सुनिल प्रभू, अतुल भातखळकर, अबु आजमी, ॲड राहुल कुल वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील शासकीय व खासगी रुग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी वापरल्या जाणा-या इन्ट्राओक्युलर लेन्सची मुळ किंमतीच्या २० पट जादा दराने विक्री किंमत आकारुन रुग्णांची मोठया प्रमाणात आर्थिक लूट करण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या गुप्तचर अधिका-यांनी तपासणी करुन दि.०८ जून, २०१७ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालात सदर बाब नमूद करणे, बलून, गाइडिंग कॅथ्रेटर व तत्सम सामुग्री मुळ किंमती पेक्षा सुमारे ५५० टक्क्यापर्यंत जादा शुल्क आकारुन रुग्णांची आर्थिक फसवणूक करणे, लेन्सची विक्री किंमत कमी असतांना मोतीबिंदू

शस्त्रक्रियेनंतर वापरलेल्या लेन्सच्या कमाल किरकोळ किंमतीचे लेबल लावण्यात येणे, लेन्सच्या माध्यमातून उत्पादक, वितरक आणि पर्यायाने रुग्णालयाकडून होत असलेली आर्थिक लूट रोखण्यासाठी शासनाने बलून आणि गाइडिंग कॅथ्रेटर व इतर सामुग्रीचा अत्यावश्यक औषधांच्या राष्ट्रीय यादीत त्वरीत समावेश करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत निर्माण झालेला संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. अमित साटम, अतुल भातखळकर, ॲड. पराग अळवणी, श्री. सुनिल शिंदे, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, भास्कर जाधव, हसन मुश्रीफ, राणाजगजीतसिंह पाटील, नरहरी झिरवाळ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, सुरेश लाड, किसन कथोरे, मो. आरिफ (नसीम) खान, प्रा. वर्षा गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री. अबू आजमी, अमीन पटेल, सुनिल प्रभू, रुपेश म्हात्रे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई विद्यापीठ प्रशासनाच्या अनागोंदी गैरकारभारामुळे विविध परिक्षांचे निकाल लावण्यात प्रचंड विलंब झालेला असल्याची माहिती माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, विद्यापीठाने यावर्षी घेतलेल्या ४७७ परिक्षांपैकी केवळ ५१ परिक्षांचे निकाल जाहीर केलेले असणे, उर्वरित ४२६ परिक्षांचे निकाल प्रलंबित असणे, सदर परिक्षांचे निकाल ४५ दिवसांत लावणे बंधनकारक असतांना प्रशासकीय विलंबामुळे निकाल लांबलेले असणे, मा. राज्यपाल यांनी कुलगुरांना दिनांक ३१ जुलै,२०१७ रोजी पर्यंत निकाल जाहिर करण्याचे आदेश देऊनही सदर परिक्षांचे निकाल जाहीर केले जात नसणे, उत्तरपत्रिका मुल्यांकनाची अत्यंत संथगतीने प्रक्रिया सुरु असुन कॅप केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरु असणे, प्राध्यापकांऐवजी इतरांकडुन उत्तरपत्रिका तपासण्यात येत असणे, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी, विद्यार्थी तसेच सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तसेच सबंधित यंत्रणांकडे दि.१७ जुलै,२०१७ रोजी तसेच यापुर्वी वारंवार मागणी केलेली असतांनाही सदर प्रकरणी आवश्यक कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, परिणामी लाखो विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठावर मोर्चा काढुन आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय, परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल विहित कालावधीत जाहीर करण्याची यंत्रणा कार्यान्वित करण्याची आवश्यकता, पुढील काळात सदरचा प्रश्न अधिकच गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झालेली असतांनाही कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने सदर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** : "जळगांव जिल्ह्यातील प्रलंबित पेयजल योजनांच्या कामाबाबत" या विषयावरील सर्वश्री किशोर पाटील व इतर वि.स.स. यांचा दिनांक २२ जुलै, २०१५ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक १९७५२ च्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **संसदीय कार्य मंत्री** : विधानसभेच्या सन २०१७ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक ६ मार्च, २०१७ ते दिनांक ७ एप्रिल, २०१७ या कालावधीत तसेच, सन २०१७ च्या दुसऱ्या (विशेष) अधिवेशनात दिनांक २० मे, २०१७ ते २२ मे, २०१७ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ३७९ आश्वासनांची यादी तसेच सन २०१७ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २२० आश्वासनांच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **उद्योग मंत्री** : महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पस्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** : (क) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** : महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**(गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**चार : सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री शशिकांत शिंदे, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, अब्दुल सत्तार, दिलीप सोपल, अमिन पटेल, गोपालदास अग्रवाल, ॲड. यशोमती ठाकूर, श्री. हसन मुश्रीफ, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री मो.आरिफ नसीम खान, राहुल मोटे, सुनिल केदार, डि एस. अहिरे, राजेश टोपे, डी.पी.सावंत, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, कालिदास कोळंबकर, दत्तात्रय भरणे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, हनुमंत डोळस, रणजित कांबळे, श्रीमती दिपिका चव्हाण, प्रा. विरेंद्र जगताप, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमित देशमुख, काशीराम पावरा, अवधुत तटकरे, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वैभव पिचड, नितेश राणे, अमित झनक, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ संतोष टारफे, शेख असिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री. अस्लम शेख, भारत भालके, संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, कुणाल पाटील, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भास्कर जाधव, राहुल मोटे, भाऊसाहेब चिकटगावकर, नरहरी झिरवाळ, बबनराव शिंदे, दिपक चव्हाण, सुरेश लाड, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"मुंबईसह राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांची डबघाईला आलेली आर्थिक परिस्थिती, नवनिर्मित नगरपंचायतींमध्ये असलेली अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, त्यामुळे विकासकामात निर्माण होत असलेले अडथळे, सर्व

महानगरपालिकांमध्ये पायाभूत सुविधांचा उडालेला बोजवारा व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, मालमत्ता कराच्या संकलनात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार असणे, जी.एस.टी.मुळे महानगरपालिकांना एलबीटीची प्रतिपूर्ती करण्यात न आल्यामुळे महानगरपालिका व नगरपालिका यांची अर्थव्यवस्था कोलमडून जाणे, जेएनएनयूआरएम योजना बंद केल्यामुळे अपूर्ण राहिलेले प्रकल्प, मुंबई महानगरपालिकेतील रस्ते, नालेसफाई व डंपिंगच्या संदर्भातील गैरकारभाराच्या चौकशीचे आदेश शासनाने देऊन देखील त्यावर पुढे कोणतीच कार्यवाही न होणे, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाचा उडालेला बोजवारा, बहुतांशी नगरपरिषदांमधील चटईक्षेत्र, टीडीआर व ऑटो डीसीआर घोटाळे शासनाच्या निदर्शनास आणून अद्यापही कोणतीच कारवाई न होणे, मुंबईतील मैदानांचा लिलाव, गृहनिर्माण धोरण अनिश्चिततेमुळे रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प, एसआरए अंतर्गत रखडलेले प्रकल्प व धारावी पुनर्विकास म्हाडा वसाहती, बीडीडी, बीआयटी चाळी व उपकर प्राप्त इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, संक्रमण शिबीरातील घुसखोरीचा प्रलंबित प्रश्न, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्याने रियल इस्टेट कायदा मंजूर केल्यानंतर बांधकाम व्यावसायिकांमध्ये निर्माण झालेली चिंता, या कायद्याच्या अंमलबजावणीत शासनाकडूनच निर्माण होत असलेले अडथळे, मुंबई शहरासह अन्य महानगरांमध्ये निर्माण झालेली वाहतुकीची समस्या, बेस्ट प्रशासन व मुंबई महापालिका आयुक्त यांच्यातील संघर्ष विकोपाला जाणे, मुंबई महापालिका, एमएमआरडीए, म्हाडा आणि सिडको यांच्यात असलेला समन्वयाचा अभाव, सिडकोकडून देण्यात आलेल्या भूखंडाचा होणारा दुरूपयोग, विविध स्थानिक स्वराज्य संस्थातील सफाई कामगारांच्या समस्यांकडे झालेले दुर्लक्ष तसेच मुंबईतील आंबेडकर भवन महानगरपालिकेने तोडण्यास परवानगी देणे, त्यामुळे राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या नियोजनात राज्य शासन अपयशी ठरुन स्थानिक स्वराज्य संस्थांशी आर्थिक कोंडी होऊन विकासाला बसलेला खीळ, त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**पाच : शासकीय विधेयक :**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री शशिकांत शिंदे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, संजय कदम, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अबु आजमी, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, संदीप नाईक, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, पांडुरंग बरोरा, हनुमंत डोळस, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, जयंत

पाटील, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, सुनील केदार, अमर काळे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४० – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४० – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

## अशासकीय कामकाज

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**सहा : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४५ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४६ - मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

**सात : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(सदरहू ठराव बॅलटद्वारा ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आले आहेत.) (क्रमांक १ ते ३)**

(१) **श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३३५**

"राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांच्या होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्र. २५९**

"राज्यामध्ये कोटयवधी रुपये खर्च करुन ग्रामीण भागामध्ये शासनाने तयार केलेल्या अनेक प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना वर्षानुवर्षे बंद असल्याने त्या योजना चालू करण्याच्या दृष्टीने शासनाला उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या १५ सदस्यांची समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. राहुल मोटे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २२८**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्य लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ जुलै, २०१७

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.